
दैनिक
# अतुल्य महाराष्ट्र
मुख्य कार्यालय : परळी वैजनाथ
बीड महाराष्ट्र |गुरुवार, 4 जून 2026| |अंक क्र. 31|वर्षे 4 थे | मुल्य 3 रूपये | पृष्ठे 4
Website : atulymaharashtra.com RNI RGN No. MAH/MAR 2023/52446 Email : dailyatulyamaharashtra@gmail.com




# "दोन घास कमी खा, पण स्वाभिमानाने राहा!" पंकजाताई मुंडे यांची गोपीनाथ गडावरून साद

## 'एक पेड बाप के नाम' उपक्रम प्रत्येकाने राबवावा ; नवरात्रात नवा संकल्प जाहीर करणार



### 'एक पेड बाप के नाम' आणि 'नैसर्गिक शेती'; गोपीनाथ गडावरुन पंकजाताईंचा नवा पर्यावरण संदेश

### गोपीनाथ गडावर लोकनेत्याला अभिवादन; पंकजा मुंडेंकडून 'एक पेड बाप के नाम'चे आवाहन!

### ना.पंकजाताई मुंडे यांचे सामाजिक बांधिलकीची साद घालणारे भाषण ; शेती, शेतकरी, वृक्षारोपण, ऊसतोड कामगारांच्या हिताचा जाहीर केला संकल्प

## सर्व नेते येऊन गेले, भविष्यात पंतप्रधान नरेंद्र मोदीही गोपिनाथगडावर येतील

परळी वैजनाथ | प्रतिनिधी

लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या स्मृती दिनानिमित्त आज गोपीनाथ गडावर दर्शनासाठी सकाळपासूनच गर्दी झाली होती. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या इंधन बचत आवाहनाला प्रतिसाद म्हणून भव्य दिव्य कार्यक्रम आयोजित नसतानाही लोकनेत्यास अभिवादन करण्यासाठी मोठी गर्दी झाली होती. याप्रसंगी राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी पर्यावरणपूरक लोकसहभागाला साद घालणारे भाषण करत वृक्षारोपण,जैविक व नैसर्गिक शेती ,स्वाभिमान, समाजसेवा, पर्यावरण संवर्धन, आणि शेतकरी हितासाठी रचनात्मक काम असे संकल्प जाहीर केले. सर्वांनी हे संकल्प पूर्ण करावे आणि पर्यावरणीय सकारात्मक बदल घडवून आणण्यासाठी योगदान द्यावे असे सांगत दोन घास कमी खा, पण स्वाभिमानाने राहा असे आवाहन केले.

लोकनेते मुंडे साहेब यांच्या स्मृतीदिनाचा कार्यक्रम आज गोपीनाथगडावर अत्यंत साधेपणाने झाला. यावेळी ना.पंकजाताई मुंडे, माजी खासदार डॉ. प्रीतमताई मुंडे, त्यांच्या मातोश्री प्रज्ञाताई, जावई गौरव खाडे , नातू आर्यमन पालवे,अगस्त्य खाडे, बंधू अजय मुंडे, रामेश्वर मुंडे यांसह मुंडे कुटुंबियांनी समाधीचे दर्शन घेतले.त्याबरोबर मुंडे साहेबांना आवडणाऱ्या पदार्थांचा नैवेद्य अर्पण करण्यात आला. याप्रसंगी आयोजित भजनाच्या कार्यक्रमात ना पंकजाताई मुंडे यांनी कुटुंबासह सहभाग घेतला. कार्यक्रमास महंत राधाताई सानप, आ.नमिता मुंदडा, माजी मंत्री बदामराव पंडित, बाळदादा पवार, रासपचे अध्यक्ष महादेव जानकर, नगराध्यक्षा पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी, वैद्यनाथ बँकेचे चेअरमन विनोद सामत, व्हाईस चेअरमन रमेश कराड, भाजप नेते गणेश हाके, प्रवीण घुगे, भाजपा जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, बाजीराव धर्माधिकारी, माधवराव निर्मळ,योगेश क्षीरसागर , प्रा.लक्ष्मण हाके, गायताई कराड,, राष्ट्रवादी काँग्रेसचे परळी न. प. गटनेते वैजनाथ सोळंके,, भाजप गटनेते प्रा.पवन मुंडे, भाजपा प्रदेश प्रवक्ता राम कुलकर्णी, आदींसह बीड जिल्ह्यातील आजी-माजी लोकप्रतिनिधी भाजप पदाधिकारी, विविध संस्थांचे पदाधिकारी आदी उपस्थित होते.



### माझा प्रत्येक श्वास वंचित, पीडित, गरजूंसाठी

यावेळी बोलताना पंकजाताई मुंडे म्हणाल्या की, एक तप उलटले तरी साहेबांच्या आठवणी विसरता येत नाहीत. मुलगी म्हणून माझ्या वाट्याला आलेल्या सर्व जबाबदाऱ्या आणि कर्तव्य मी मुंडे साहेबांना शोभेल अशा पद्धतीने पार पाडली आहेत. स्वाभिमान जपत, सामाजिक सलोख्यासाठी जाती-धर्मांच्या भिंती भेदून अठरापगड जाती धर्मासाठी प्रामाणिकपणे काम करत आहे. बारा वर्षे झाली, पण मुंडे साहेबांचे पुण्यस्मरण करताना तुमचे निरपेक्ष प्रेम बघून आजही माझा प्रत्येक श्वास जनतेकडे गहाण ठेवून काम करत आहे. स्व. गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या निधनानंतर तुमची व माझी कधीही भरून न येणारी अशी हानी झालेली आहे. तीन जून रोजी याच ठिकाणी मी माझ्या हाताने माझा पिता आणि आपला नेता यांना अखेरचा निरोप दिला आहे. आजही मला आणि माझ्या आईला 2 जूनची भयाण रात्र आठवते. साहेबांनी अगदी शून्यापासून संघर्षमय प्रवास केला. "आयुष्य लांब असण्यापेक्षा मोठे असावे," याप्रमाणे आपल्या कर्तुत्वाने आज साहेबांचे स्थान घराघरातील देव्हाऱ्यात आहे असे सांगत त्यांनी कार्यकर्त्यांना समाजासाठी झटण्याचा संदेश दिला. माझा प्रत्येक श्वास वंचित, पीडित आणि गरजूंसाठी आहे. आपल्या पेक्षा दुर्बल असलेल्या व्यक्तींना मदतीचा हात द्या. दोन घास कमी खा, पण स्वाभिमानाने जगा, असा संदेश त्यांनी उपस्थितांना दिला.

### 'एक पेड बाप के नाम', गडावर वृक्षारोपण ; उपस्थितांना रोपांचे वाटप

पर्यावरणासमोरील आव्हानांचा उल्लेख करत पंकजाताई मुंडे यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरु केलेल्या ' एक पेड मॉ के नाम' उपक्रमाबरोबरच "एक पेड़ बाप के नाम" हा संकल्प राबविण्याचे आवाहन केले. प्रत्येकाने किमान 11 झाडे लावून त्यांचे संवर्धन करावे, प्रत्येकानी कौटुंबिक ,सामाजिक व सार्वजनिक कार्यक्रमात वृक्षारोपण करावे आणि त्याचे संवर्धन करावे असे त्यांनी सांगितले. या संकल्पाची सुरुवात त्यांनी गडाच्या परिसरात वृक्षारोपण करून केली. यावेळी विविध वृक्षांची सुमारे एक हजार रोपे उपस्थितांना वाटप करण्यात आली.



### शेती, शेतकरी, ऊसतोड कामगारांच्या बांधिलकीचा संकल्प

शेती आणि शेतकऱ्यांच्या प्रश्नांवर बोलताना ना. पंकजाताई मुंडे यांनी सांगितले की, रासायनिक खतांऐवजी जैविक व नैसर्गिक शेतीचा आग्रह धरला पाहिजे. या संकल्पाची सुरुवात मी स्वतः पासून करणार असून मी स्वतः आता जैविक व नैसर्गिक प्रत्यक्षात करणार आहे आपण सर्वांनी यासाठी योगदान दिले पाहिजे. शेतकऱ्यांच्या जीवनाशी एकरूप होण्याकरिता "जावे त्यांच्या वंशा, तेव्हा कळे' या न्यायाप्रमाणे मी स्वतः नांगर धरणार, ट्रॅक्टर चालवणार आणि शेती करणार आहे अशी घोषणा त्यांनी केली. तसेच ऊसतोड कामगारांच्या जीवनाशी एकरूप होत त्यांच्या सोबत 12 डिसेंबरला प्रत्यक्ष ऊसाच्या फडात जाऊन ऊसतोडणी करण्याचाही संकल्प त्यांनी व्यक्त केला.

### नवरात्रोत्सवात नवा सामाजिक संकल्प जाहीर करणार

आज पर्यावरणाला पूरक होतील अशा प्रकारचे संकल्प आपण हाती घेतले आहेत यासाठी मी स्वतः निर्धार केला आहे आपणही या संकल्पना प्रत्यक्षात उतरण्यासाठी कामाला लागावे असे आवाहन यावेळी पंकजाताई मुंडे यांनी केले. तसेच आगामी नवरात्रोत्सवात नवा सामाजिक संकल्प जाहीर करणार असल्याचेही त्यांनी सांगितले. सामाजिक सलोखा आणि विकासाच्या माध्यमातून बीड जिल्ह्यातील सामाजिक घडी अधिक मजबूत करण्याचा निर्धार त्यांनी यावेळी व्यक्त केला.

### भविष्यात पंतप्रधान नरेंद्र मोदी ही गोपीनाथ गडावर येतील

वंचित ,उपेक्षित ,दुर्बल घटकांना न्याय देण्याची भूमिका आयुष्यभर जपणाऱ्या आपल्या मुंडे साहेबांना अभिप्रेत असेच काम तुम्ही आणि मी आपण सर्वांनी करायचे आहे. आपण जसे वागू तसे परिणाम दिसत असतात. त्यामुळे स्वाभिमान जपत आपण स्वर्गातही मुंडे साहेबांची मान उंचावेल असेच काम केले पाहिजे. सामाजिक सलोखा आणि आपल्यापेक्षा क्षीण व्यक्तीच्या मदतीला आपण आले पाहिजे. जागतिक स्तरावर आज संकटाची परिस्थिती असून आपल्या देशात ही परिस्थिती उद्भवू नये यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी हे सातत्याने आपल्याला आवाहन करत आहेत. या देश कार्यात आपण सहभाग घेतला पाहिजे. आपल्या कृतीतून आणि माणसाला माणूस म्हणून जगता यावे या उद्देशाने प्रत्येकाने योगदान देणे अभिप्रेत आहे. गोपीनाथ गडाच्या उभारणीला अमित शहा, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, अनेक मंत्री, अनेक पक्षप्रमुख आले होते. सर्वच शीर्षस्थ नेते आपल्या गडावर येऊन गेले आहेत आता एकमेव पंतप्रधान नरेंद्र मोदी हे आपल्या गडावर यायचे राहिले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी भविष्यात गोपीनाथ गडावर नक्कीच येतील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

### दिवंगत एजाजभाई देशमुख यांच्या परिवाराला पाच लाख रुपयांची मदत

भाजप अल्पसंख्यांक मोर्चाचे माजी प्रदेशाध्यक्ष बीड येथील दिवंगत नेते एजाजभाई देशमुख यांच्या निधनानंतर त्यांच्या परिवाराला गोपीनाथ मुंडे प्रतिष्ठानच्या वतीने पाच लाख रुपयांची मदत जाहीर केली होती. आजच्या स्मृतीदिनी ना. पंकजाताई मुंडे यांनी एजाजभाई यांच्या कुटुंबियांना आज 5 लाख रुपयांचा धनादेश त्यांच्या परिवाराकडे सुपूर्द करून आपला दिलेला शब्द पाळला.



## लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात पुण्यतिथी निमित्त स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांना अभिवादन

परळी वैजनाथ | प्रतिनिधी

लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात केंद्रीय ग्रामविकास मंत्री, माजी उपमुख्यमंत्री स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

शहरातील लक्ष्मीबाई देशमुख महिला महाविद्यालयात लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या पुण्यतिथी निमित्त आयोजित अभिवादन कार्यक्रमास संस्थेचे अध्यक्ष संजय देशमुख, सचिव रवींद्र देशमुख संचालिका छायाताई देशमुख, कार्यालयीन अधिक्षक अनिल पत्की उपस्थित होते. कार्यक्रमाच्या सुरुवातीला संस्थेचे अध्यक्ष संजय देशमुख यांच्या हस्ते लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी बोलताना संजय देशमुख म्हणाले की, लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांचे कार्य आजही तेवढेच महत्त्वाचे आहे. त्यांचे मराठवाड्याच्या विकासात मोठे योगदान आहे. ते संघर्षनेते होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा प्रविण फुटके यांनी तर आभार प्रा अशोक पवार यांनी मानले. कार्यक्रमास प्रा डॉ विना भांगे, प्रा विशाल पौळ, दिपक सातपुतेसह प्राध्यापक, शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

# निष्पाप बालपणावर आक्रमकतेची सावली

दरवर्षी ४ जून हा दिवस जगभरात "आक्रमकतेचे बळी ठरलेल्या निष्पाप मुलांचा आंतरराष्ट्रीय दिन" म्हणून पाळला जातो. हा दिवस केवळ दिनदर्शिकेतील एक औपचारिक नोंद नाही, तर मानवी संवेदनशीलतेला जागृत करणारा, जगाच्या विवेकाला प्रश्न विचारणारा आणि बालहक्कांच्या संरक्षणासाठी सामूहिक जबाबदारीची जाणीव करून देणारा दिवस आहे. जगात जेव्हा जेव्हा युद्धे, दहशतवादी हल्ले, सशस्त्र संघर्ष, जातीय हिंसाचार, धार्मिक संघर्ष किंवा कोणत्याही प्रकारची आक्रमकता निर्माण होते, तेव्हा त्याचे सर्वाधिक गंभीर परिणाम निरपराध मुलांवर होतात. ज्या वयात मुलांच्या हातात पुस्तके, खेळणी आणि रंगीत स्वप्ने असावीत, त्या वयात अनेक मुलांच्या हातात भीती, असुरक्षितता आणि वेदना येतात. त्यांचे बालपण हिरावले जाते, शिक्षण खंडित होते, कुटुंबे तुटतात आणि भविष्य अंधकारमय बनते. या सर्व परिस्थितीचा गांभीर्याने विचार करण्यासाठी आणि जगभरातील बालकांच्या संरक्षणासाठी जागतिक स्तरावर जनजागृती करण्याच्या उद्देशाने हा दिवस साजरा केला जातो. या आंतरराष्ट्रीय दिनाची सुरुवात १९८२ मध्ये झाली. त्या काळात मध्यपूर्वेतील संघर्षांमध्ये विशेषतः लेबनॉन आणि पॅलेस्टाईन भागातील अनेक निष्पाप मुलांचा मृत्यू झाला होता. युद्धाच्या भयावहतेमुळे हजारो बालके जखमी झाली, बेघर झाली आणि मानसिक आघाताची शिकार झाली. या घटनांनी संपूर्ण जगाला हादरवून सोडले. त्यानंतर संयुक्त राष्ट्र महासभेने ४ जून हा दिवस आक्रमकतेचे बळी ठरलेल्या मुलांच्या स्मरणार्थ आणि त्यांच्या संरक्षणासाठी जागतिक प्रयत्नांना बळ देण्यासाठी घोषित केला. कालांतराने या दिवसाचा आशय अधिक व्यापक झाला. आज हा दिवस केवळ युद्धग्रस्त मुलांपुरता मर्यादित राहिलेला नाही, तर कोणत्याही प्रकारच्या हिंसा, अत्याचार, शोषण, दडपशाही आणि आक्रमकतेचा बळी ठरलेल्या सर्व मुलांच्या संरक्षणासाठी समर्पित आहे.






**डॉ. राजेंद्र बगाटे,**
**(समाजशास्त्राचे अभ्यासक)**

बालपण हा मानवी जीवनाचा सर्वात नाजूक आणि महत्त्वाचा टप्पा असतो. याच काळात मुलांचे व्यक्तिमत्त्व घडत असते, त्यांची मानसिकता विकसित होत असते आणि त्यांच्या भविष्याचा पाया रचला जात असतो. प्रत्येक मुलाला प्रेम, माया, संरक्षण, शिक्षण, आरोग्य आणि सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे. परंतु वास्तवात जगातील लाखो मुले या मूलभूत अधिकारांपासून वंचित आहेत. संघर्ष, हिंसा आणि आक्रमकतेमुळे त्यांचे बालपण उद्ध्वस्त होत आहे. जगात घडणाऱ्या प्रत्येक युद्धाचा आणि प्रत्येक हिंसक घटनेचा सर्वात मोठा फटका मुलांनाच बसतो.

युद्ध हा मानवतेसाठी सर्वात मोठा शाप मानला जातो. युद्धात केवळ सैनिकच मरत नाहीत, तर निरपराध नागरिकांचेदेखील मोठ्या प्रमाणावर नुकसान होते. त्यामध्ये मुलांचे प्रमाण लक्षणीय असते. युद्धामुळे घरे उद्ध्वस्त होतात, शाळा बंद पडतात, रुग्णालये नष्ट होतात आणि संपूर्ण सामाजिक व्यवस्था विस्कळीत होते. अशा परिस्थितीत मुलांना अन्न, पाणी, आरोग्यसेवा आणि शिक्षण यांसारख्या मूलभूत गरजांसाठी संघर्ष करावा लागतो. अनेक वेळा त्यांना आपले घर, गाव आणि देश सोडून निर्वासित म्हणून जगावे लागते.

युद्धग्रस्त प्रदेशांतील मुलांचे जीवन अत्यंत कठीण असते. सततचा गोळीबार, बॉम्बस्फोट, हवाई हल्ले आणि मृत्यूचे वातावरण त्यांच्या मनात कायमस्वरूपी भीती निर्माण करते. अनेक मुले आपल्या डोळ्यांसमोर आई-वडील, भाऊ-बहिण किंवा नातेवाईक गमावतात. काही मुले अनाथ होतात, तर काही कुटुंबापासून वेगळी होतात. अशा परिस्थितीत त्यांच्यावर होणारा मानसिक परिणाम अत्यंत गंभीर असतो. मानसशास्त्रज्ञांच्या मते, बालपणी अनुभवलेले युद्ध आणि हिंसाचार यांचे परिणाम व्यक्तीच्या संपूर्ण आयुष्यावर दिसून येतात.

युद्धामुळे शिक्षणावर होणारा परिणामही गंभीर असतो. शाळा उद्ध्वस्त झाल्यामुळे किंवा सुरक्षिततेच्या कारणास्तव बंद राहिल्यामुळे लाखो मुले शिक्षणापासून वंचित राहतात. शिक्षण ही मुलांच्या विकासाची सर्वात प्रभावी गुरुकिल्ली आहे. शिक्षणामुळेच त्यांना आत्मविश्वास, कौशल्ये आणि उज्ज्वल भविष्याची दिशा मिळते. परंतु संघर्षामुळे शिक्षण खंडित झाल्यास त्यांच्या जीवनातील अनेक संधी कायमच्या नष्ट होतात. अशा मुलांपैकी अनेकजण पुन्हा कधीही शाळेत जाऊ शकत नाहीत.

आक्रमकतेचा परिणाम केवळ युद्धापुरता मर्यादित नसतो. घरगुती हिंसा ही देखील मुलांवरील आक्रमकतेचे एक गंभीर रूप आहे. अनेक मुले स्वतःच्या घरात शारीरिक, मानसिक किंवा भावनिक अत्याचार सहन करतात. पालकांमधील सततचे वाद, व्यसनाधीनता, आर्थिक तणाव आणि कौटुंबिक कलह यांचा परिणाम मुलांच्या मानसिक आरोग्यावर होतो. घर हे मुलांसाठी सुरक्षिततेचे ठिकाण असले पाहिजे; परंतु जेव्हा घरच भीतीचे केंद्र बनते, तेव्हा मुलांच्या व्यक्तिमत्त्वाच्या विकासावर गंभीर परिणाम होतो.

बालकांवरील लैंगिक अत्याचार ही आधुनिक समाजातील अत्यंत गंभीर समस्या आहे. जगभरात लाखो मुले अशा अत्याचारांची शिकार होतात. या अत्याचारांमुळे त्यांच्या शारीरिक आरोग्यासोबतच मानसिक आणि भावनिक आरोग्यावरही खोल परिणाम होतो. अनेक वेळा पीडित मुले भीतीमुळे किंवा सामाजिक दबावामुळे आपले अनुभव व्यक्त करू शकत नाहीत. परिणामी त्यांचे दुःख अधिक वाढते. बालकांच्या सुरक्षिततेसाठी कुटुंब, शाळा, समाज आणि शासन या सर्वांनी एकत्रितपणे प्रयत्न करणे आवश्यक आहे.

बालमजुरी हे देखील मुलांच्या हक्कांचे गंभीर उल्लंघन आहे. जगातील अनेक भागांमध्ये अजूनही लाखो मुले काम करण्यास भाग पाडली जातात. गरिबी, बेरोजगारी आणि सामाजिक विषमता यांमुळे कुटुंबांना आपल्या मुलांना शिक्षणाऐवजी कामावर पाठवावे लागते. कारखाने, खाणी, बांधकाम क्षेत्र, शेती आणि घरगुती कामांमध्ये गुंतलेली ही मुले अनेकदा अमानुष परिस्थितीत काम करतात. त्यांचे शिक्षण थांबते, आरोग्य बिघडते आणि बालपण हिरावले जाते.

मानवतस्करी ही मुलांसाठी आणखी एक गंभीर समस्या आहे. अनेक मुलांना फसवून, अपहरण करून किंवा गरिबीचा फायदा घेऊन तस्करीच्या जाळ्यात अडकवले जाते. त्यांचा वापर सक्तीच्या मजुरीसाठी, लैंगिक शोषणासाठी, भीक मागण्यासाठी किंवा गुन्हेगारी कारवायांसाठी केला जातो. अशा मुलांचे जीवन पूर्णपणे उद्ध्वस्त होते. त्यांना स्वातंत्र्य, शिक्षण आणि सन्मानाने जगण्याच्या संधींपासून वंचित राहावे लागते.

तंत्रज्ञानाच्या वाढत्या वापरामुळे मुलांसमोर नवीन प्रकारची आव्हाने उभी राहिली आहेत. इंटरनेट आणि सोशल मीडियामुळे संवाद आणि ज्ञानाची नवी क्षितिजे खुली झाली असली तरी सायबर बुलिंग, ऑनलाइन छळ, डिजिटल फसवणूक आणि इंटरनेटद्वारे होणारे शोषण या समस्या वाढल्या आहेत. अनेक मुले सोशल मीडियावर अपमानास्पद संदेश, धमक्या किंवा मानसिक छळाला सामोरे जातात. या प्रकारच्या अनुभवांचा त्यांच्या आत्मविश्वासावर आणि मानसिक आरोग्यावर नकारात्मक परिणाम होतो.

संघर्ष आणि हिंसाचारामुळे निर्माण होणाऱ्या निर्वासितांच्या समस्येत मुलांचे प्रमाण खूप मोठे आहे. जेव्हा कुटुंबांना आपले घर सोडून सुरक्षिततेसाठी दुसरीकडे जावे लागते, तेव्हा मुलांचे जीवन पूर्णपणे बदलून जाते. त्यांना नवीन वातावरणाशी जुळवून घ्यावे लागते. अनेक वेळा त्यांच्याकडे अन्न, पाणी, निवारा आणि शिक्षणाच्या सुविधा उपलब्ध नसतात. निर्वासित छावण्यांमध्ये राहणाऱ्या मुलांना अनेक सामाजिक आणि मानसिक अडचणींना सामोरे जावे लागते.

बालकांच्या संरक्षणासाठी आंतरराष्ट्रीय स्तरावर अनेक महत्त्वपूर्ण प्रयत्न केले जात आहेत. संयुक्त राष्ट्रांनी बालहक्कांच्या संरक्षणासाठी विविध करार आणि धोरणे स्वीकारली आहेत. बालकांना जीवन, शिक्षण, आरोग्य, संरक्षण आणि विकासाचा अधिकार आहे, ही संकल्पना आज जागतिक स्तरावर मान्य झाली आहे. तरीही अनेक देशांमध्ये या हक्कांची अंमलबजावणी अपुरी आहे. त्यामुळे आंतरराष्ट्रीय सहकार्य आणि प्रभावी धोरणांची आवश्यकता कायम आहे.

बालकांच्या संरक्षणासाठी कार्य करणाऱ्या अनेक आंतरराष्ट्रीय संस्था संघर्षग्रस्त आणि अत्याचारग्रस्त मुलांच्या पुनर्वसनासाठी महत्त्वपूर्ण योगदान देत आहेत. शिक्षण, पोषण, आरोग्यसेवा, मानसिक आधार आणि पुनर्वसन कार्यक्रमांच्या माध्यमातून लाखो मुलांना नवजीवन देण्याचा प्रयत्न केला जात आहे. तथापि, समस्या इतकी व्यापक आहे की केवळ संस्थांचे प्रयत्न पुरेसे नाहीत. संपूर्ण समाजाने या विषयाकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे.

भारतातही बालसंरक्षणासाठी विविध कायदे आणि योजना अस्तित्वात आहेत. बालमजुरी प्रतिबंध, बालविवाह प्रतिबंध, शिक्षणाचा अधिकार, लैंगिक अत्याचारांपासून संरक्षण आणि बालहक्क संवर्धन यांसाठी अनेक कायदेशीर तरतुदी करण्यात आल्या आहेत. विविध शासकीय आणि स्वयंसेवी संस्थांच्या माध्यमातून मुलांच्या कल्याणासाठी अनेक कार्यक्रम राबविले जात आहेत. तरीही सामाजिक विषमता, गरिबी, अशिक्षण आणि जागरूकतेचा अभाव यांमुळे अनेक आव्हाने कायम आहेत.


बालसंरक्षणामध्ये कुटुंबाची भूमिका सर्वात महत्त्वाची असते. मुलांना प्रेम, विश्वास आणि सुरक्षिततेचे वातावरण मिळणे आवश्यक आहे. पालकांनी मुलांशी नियमित संवाद साधला पाहिजे, त्यांच्या भावना समजून घेतल्या पाहिजेत आणि त्यांना कोणत्याही प्रकारच्या अत्याचाराविरोधात बोलण्याचे धैर्य दिले पाहिजे. मुलांच्या मनातील भीती, ताण किंवा अस्वस्थता वेळेवर ओळखणे आणि त्यांना योग्य येते. माध्यमांनी मुलांच्या गोपनीयतेचे संरक्षण करताना त्यांच्या सन्मानाचे जतन करणेही तितकेच आवश्यक आहे.

आक्रमकतेचे बळी ठरलेल्या मुलांच्या पुनर्वसनासाठी केवळ आर्थिक मदत पुरेशी नसते. त्यांना भावनिक आधार, मानसिक आरोग्य सेवा, शिक्षण आणि सामाजिक स्वीकाराची आवश्यकता असते. कला, संगीत, क्रीडा, साहित्य आणि विविध सर्जनशील उपक्रमांच्या माध्यमातून त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण करता येतो. त्यांना पुन्हा सामान्य जीवनाकडे आणण्यासाठी समाजाने संवेदनशीलतेने आणि जबाबदारीने काम करणे गरजेचे आहे.

शांतता, सहिष्णुता आणि मानवता या मूल्यांवर आधारित समाजनिर्मिती ही मुलांच्या संरक्षणासाठी अत्यावश्यक आहे. जगातील कोणत्याही कोपऱ्यातील हिंसा आणि संघर्षाचा परिणाम शेवटी निष्पाप मुलांवर होतो. त्यामुळे युद्धाऐवजी संवाद, द्वेषाऐवजी सहकार्य आणि हिंसेऐवजी मानवतेचा मार्ग स्वीकारणे ही काळाची गरज आहे.

४ जून रोजी साजरा होणारा 'आक्रमकतेचे बळी ठरलेल्या निष्पाप मुलांचा आंतरराष्ट्रीय दिन' आपल्याला एक महत्त्वपूर्ण संदेश देतो की मुलांचे संरक्षण ही केवळ कायद्याची किंवा शासनाची जबाबदारी नसून संपूर्ण समाजाची सामूहिक जबाबदारी आहे. प्रत्येक मुलाला सुरक्षित, सन्मानपूर्ण आणि आनंदी बालपण मिळाले पाहिजे. त्यांच्या डोळ्यांतील स्वप्ने जपणे, त्यांच्या चेहऱ्यावरील हास्य कायम ठेवणे आणि त्यांना भीतीमुक्त वातावरण देणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे.

आजच्या या निमित्ताने आपण असा संकल्प करूया की कोणत्याही मुलाला हिंसा, शोषण किंवा आक्रमकतेचे बळी ठरावे लागणार नाही. प्रत्येक बालकाला शिक्षण, आरोग्य, संरक्षण आणि विकासाच्या समान संधी मिळतील. कारण मुलांचे बालपण सुरक्षित असेल तरच मानवतेचे भविष्य सुरक्षित राहील. निष्पाप मुलांचे संरक्षण म्हणजे केवळ एका पिढीचे संरक्षण नाही, तर संपूर्ण जगाच्या उद्याचे संरक्षण आहे. म्हणूनच या आंतरराष्ट्रीय दिनाचे औचित्य साधून बालहक्कांच्या रक्षणासाठी आणि हिंसामुक्त, न्याय्य व संवेदनशील समाजनिर्मितीसाठी प्रत्येकाने आपले योगदान देणे हीच काळाची खरी गरज आहे.



## गोपीनाथगडाकडे जाणाऱ्या भाविकांचे मुंडे चौकात अभिवादन; कोकाटे महाराजांकडून स्वागत व पाणी वाटप

परळी | लोकनेते गोपीनाथ मुंडे यांच्या पुण्यतिथीनिमित्त गोपीनाथगडावर दर्शनासाठी जाणाऱ्या हजारो भाविकांनी परळीतील स्व. गोपीनाथराव मुंडे साहेब चौकात थांबून त्यांना भावपूर्ण अभिवादन केले. "गोपीनाथ मुंडे साहेब अमर रहे" च्या जयघोषात भाविकांनी श्रद्धांजली वाहत गडाकडे प्रस्थान केले.

चौकाचे संस्थापक अध्यक्ष ह.भ.प. रामेश्वर महाराज कोकाटे यांनी स्वतः उपस्थित राहून भाविकांचे स्वागत केले. उन्हाची तीव्रता लक्षात घेता अखिल भारतीय वारकरी मंडळाच्या वतीने भाविकांसाठी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात आली होती. दिवसभर भाविकांची मोठी गर्दी या ठिकाणी पाहायला मिळाली.

यावर्षी पंकजाताई मुंडे यांनी पुण्यतिथी साधेपणाने साजरी करण्याचे आवाहन केल्याने मोठे कार्यक्रम न घेता पाणी वाटप व अभिवादनाचा उपक्रम राबविण्यात आला.

यावेळी बोलताना रामेश्वर महाराज कोकाटे म्हणाले, "गोपीनाथ मुंडे साहेबांचा वारकरी संप्रदायावर विशेष प्रेम होत. त्यांच्या स्मृतीला अभिवादन करण्यासाठी आलेल्या प्रत्येक भाविकाची सेवा करणे हे आमचे कर्तव्य आहे. साहेब हयात असताना आम्ही त्यांचा वाढदिवस साजरा करत होतो. त्यांच्या निधनानंतर त्यांच्या स्मृती कायम जिवंत राहाव्यात म्हणून या चौकाला त्यांचे नाव दिले. येथे दरवर्षी श्रद्धांजली, पाणी वाटप, नारळपाणी वितरण, खिचडी वाटप, भारूड, भजन, मृदंग वादन, राज्यस्तरीय भजन स्पर्धा, वृक्षारोपण यांसारखे विविध सामाजिक व सांस्कृतिक उपक्रम राबविले जातात.

साधेपणाने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमातून भाविकांची सेवा करत मुंडे साहेबांप्रती कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. हजारो भाविकांनी हात जोडून श्रद्धांजली अर्पण करत त्यांच्या कार्याच्या आठवणींना उजाळा दिला.

## परळी वैजनाथमधून १३ वर्षांचा राजविर पवार हरवला- शोध घेण्याचे पोलिसांचे व नातेवाईकांचे आवाहन!

**परळी वैजनाथ** | परळी वैजनाथ शहरातील शिवाजी नगर भागातून १३ वर्षांचा राजविर महेंद्र पवार हा मुलगा हरवल्याची धक्कादायक घटना घडली आहे. याप्रकरणी संभाजी नगर पोलीस स्टेशन आणि त्याच्या नातेवाईकांनी नागरिकांना तात्काळ मदतीचे व शोध घेण्याचे आवाहन केले आहे.

हरवलेल्या मुलाची सविस्तर माहिती:

नाव: राजविर महेंद्र पवार

वय: १३ वर्षे

राहणार: शिवाजी नगर, परळी वैजनाथ, जि. बीड

शारीरिक वर्णन: रंग गोरा, उंची ४ फूट ४ इंच

अंगावरील कपडे: काळ्या रंगाचा शर्ट, निळी पँट आणि पायात काळ्या रंगाची चप्पल आहे.

हा मुलगा शिवाजी नगर, परळी वैजनाथ येथून हरवला असून त्याचा शोध अद्याप लागलेला नाही.

हा मुलगा कोणालाही आढळून आल्यास किंवा याच्याबाबत काहीही माहिती मिळाल्यास खालील नंबरवर तात्काळ संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.




## मान्सून केरलममध्ये पोहोचला, यावर्षी 3 दिवस लेट

आयएमडीच्या वेबसाइटवर मान्सूनच्या भारतातील प्रवेशाचा उपग्रह नकाशा, ज्यामध्ये तो निळ्या-पांढऱ्या ढगांच्या रूपात दाखवला आहे.

भारतीय हवामान विभागाने (आयएमडी) केरळमध्ये मान्सून दाखल झाल्याचा दावा केला आहे. परिणामी, पुढील सात दिवसांत केरळ तसेच तामिळनाडू आणि कर्नाटकच्या काही भागांमध्ये मुसळधार पावसाची शक्यता आहे.

यंदा मान्सून तीन दिवस उशिरा आला आहे. साधारणपणे, तो दीड महिन्यात संपूर्ण देश व्यापून १ जून रोजी केरळमध्ये पोहोचतो. हवामान खात्याने यापूर्वी मान्सून २६ मे रोजी केरळमध्ये पोहोचेल असा अंदाज वर्तवला होता.



दैनिक पत्रक प्रकाशक मालक संपादक श्री. नितीन सोपानराव ढाकणे मुद्रक विठ्ठल त्रिंबक साबळे मातोश्री ऑफसेट प्रिंटर्स, मोंढा, हैद्राबाद बँकेजवळ परळी वैजनाथ, जि. बीड पिन - 431515 येथे छापुन मुख्य कार्यालय दैनिक अतुल्य महाराष्ट्र, जलालपुर रोड परळी वै. ता. परळी वै.जि.बीड (महाराष्ट्र) पिन - 431515 येथे प्रकाशित केले आहे. संपादक नितीन सोपानराव ढाकणे, मो. 8446447777 (वाद : परळी न्यायलय अंतर्गत)

# नगराध्यक्षांसह नगरपरिषदेचे नगरसेवक, नगरसेविका गोपीनाथगडावर नतमस्तक

## लोकनेते गोपीनाथराव मुंडेंचा आदर्श डोळ्यासमोर ठेवुन काम करण्याचा निर्धार





**परळी वैजनाथ | प्रतिनिधी**

दिवंगत लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या बाराव्या स्मृती दिनानिमित्त परळी न.प.च्या नगराध्यक्षा पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांच्यासह नगरसेवक, नगरसेविकांनी गोपीनाथगडावर जावुन लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या समाधी स्थळाचे दर्शन घेतले. यावेळी वंचीत, उपेक्षित, कामगार, कष्टकरी आदी सर्व घटकांना न्याय देण्याची लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांची भूमिका पुढे घेवुन जाण्याचा आदर्श नगरपरिषद नियामक मंडळ घेत असुन मुंडे साहेबांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवुन काम करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांचे समाधीस्थळ असलेल्या गोपीनाथगडावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या इंधन बचतीच्या आवाहनाला प्रतिसाद म्हणुन भव्य कार्यक्रमाचे आयोजन केलेले नसतानाही दिवसभर दर्शनासाठी मोठी गर्दी झाली होती. यामध्ये राजकीय, सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक आदी विविध स्तरातील नागरीकांनी आपल्या लाडक्या लोकनेत्याच्या समाधीचे दर्शन घेतले. याच अनुषंगाने परळी वैजनाथ नगरपरिषदेच्या नगराध्यक्ष व सर्व नगरसेवकांनी एकत्रितपणे गोपीनाथगडावर जावुन  लोकनेत्याच्या चरणी विनम्र अभिवादन केले. यावेळी नगराध्यक्ष सौ.पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी, मा.नगराध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी, रा.कॉ. गटनेते वैजनाथ सोळंके, भाजपा गटनेते तथा बांधकाम सभापती पवन मुंडे, निळकंठ चाटे, राजाभैय्या पांडे, योगेश मेनकुदळे, महेंद्र रोडे, डॉ. पुजा प्रितेश तोतला, अंजली माळी, अर्चना रोडे, जयराज देशमुख, भिमा डावरे, आश्विन आघाव, सुशिल हरंगुळे, संपत बळवंत, प्रणव मराठे,  प्रितेश तोतला, आदींसह नगरसेवक, नगरसेविका उपस्थित होते.

# स्वप्नांच्या मातीतील झुंजार फुल : ज्ञानदा ठोंबरे

**देऊळगाव (आदिनाथ ठोंबरे)**



गर्भगिरी पर्वताच्या पायथ्याशी वसलेलं एक छोटसं गाव, म्हणजे घाट देऊळगाव.या देऊळगाव घाट गावाला एक संत भूमीची परंपरा लाभलेली आहे. या गावाने देशासाठी लढायला अनेक वीर दिले, या गावाने चांगले विद्यार्थी घडवण्यासाठी अनेक शिक्षक दिले, या गावाने अनेक नामवंत कीर्तनकार दिले, या गावाने संभाजीनगर विभागासाठी एक महिला कुस्तीपटू दिली, तिचे नाव म्हणजे ज्ञानदा ठोंबरे.या देऊळगाव घाट च्या पहिल्या महिला कुस्तीपटू ठरल्या. ज्ञानदा ठोंबरे हिचे माध्यमिक शिक्षण देऊळगाव घाट तालुका आष्टी जिल्हा बीड येथे चालू आहे ज्ञानदा ठोंबरे ही कुस्तीचे धडे इंटरनॅशनल कुस्ती संकुल श्रीगोंदा तालुका श्रीगोंदा जिल्हा अहिल्यानगर येथे हनुमंत फड यांच्या मार्गदर्शनाखाली कुस्ती चे शिक्षण घेत आहे. देऊळगावच्या मातीत जन्मलेली ज्ञानदा ठोंबरे ही केवळ एक कुस्तीपटू नाही, तर संघर्षाच्या अंगारातून तावून-सुलाखून निघालेली एक जिद्दी ज्योत आहे. तिच्या आयुष्याचा प्रत्येक डाव हा पराभवाला आव्हान देणारा आणि यशाच्या शिखराकडे झेपावणारा ठरला आहे. ज्ञानदा ही प्रथम तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेत पराभव झाली  पण तिचे पाऊल डगमगले नाही, उलट त्या पराभवाच्या राखेतून तिने नव्या उमेदेचे पंख उभे केले. ती दुसऱ्या वर्षी तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धा जिंकून जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेत पोहोचली. परंतु त्यावेळेस ती जिल्हास्तरीय स्पर्धा हरली. पण हार मानेल ती ज्ञानदा कुठली... पुढच्या वर्षी ती तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धा जिंकली जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धा जिंकली विभागीय कुस्ती स्पर्धा जिंकली आणि तिन्ही राज्यस्तरीय कुस्ती स्पर्धेत भाग घेतला. तिच्या घामाच्या प्रत्येक थेंबाने तिच्या स्वप्नांना आकार दिला. आणि पुढे राज्यस्तरीय स्पर्धेच्या भव्य रंगमंचावर तिने आपल्या कर्तृत्वाचा ठसा उमटवला. तिच्या मनात एक सुंदर स्वप्न दररोज बहरत होते. एका दिवशी तिने आपल्या वडिलांच्या डोळ्यांत डोळे घालून विश्वासाने म्हटले होते—

"बाबा, यावेळी मी राज्यस्तरीय कुस्ती जिंकणार... आणि तुम्ही माझ्यासाठी गाडी घ्यायची!"हे केवळ शब्द नव्हते; तो तिच्या कष्टांचा संकल्प होता, तिच्या आत्मविश्वासाचा हुंकार होता, आणि तिच्या स्वप्नांच्या आकाशात उडणाऱ्या गरुडाची भरारी होती.

सिंधुदुर्गच्या राज्यस्तरीय स्पर्धेत ती वादळासारखी झुंजली. प्रतिस्पर्ध्यांना धैर्याने भिडत ती उपांत्य फेरीपर्यंत पोहोचली. विजेतेपद तिच्या हातांच्या अंतरावर उभे होते; पण नियतीने त्या दिवशी तिच्या गळ्यात सुवर्णपदकाऐवजी अनुभवांची माळ घातली. गाडीचे स्वप्न,राज्यविजेतेपदाचे स्वप्न, त्या क्षणी अपूर्ण राहिले.परंतु काही स्वप्ने पूर्ण होण्यासाठी वेळ लागतो. आकाशाला स्पर्श करणाऱ्या प्रत्येक गरुडाला आधी वादळांशी सामना करावा लागतो. ज्ञानदाचेही तेच झाले. ती हरली नाही; ती घडत गेली. तिच्या पराभवांनी तिचा मार्ग अडवला नाही, तर तिच्या यशाच्या पायऱ्या अधिक मजबूत केल्या.आज तिचा प्रवास पाहिला तर तो एका नदीसारखा वाटतो—खडकांवर आदळणारा, वळणे घेत पुढे जाणारा, पण अखेरीस सागराला कवेत घेण्याची जिद्द न सोडणारा. तिचा आलेख पराभवातून उंचावत गेला, तिचे कर्तृत्व गावाच्या सीमा ओलांडून अनेकांसाठी प्रेरणेचा दीप बनले.

"स्वप्न अपूर्ण राहिले म्हणून ते संपत नाही; उलट अपूर्ण स्वप्नेच मनात जिद्दीचे नवे सूर्य उगवतात. ज्ञानदा ठोंबरे ही अशाच उगवत्या सूर्याची तेजस्वी किरण आहे." देऊळगावच्या या झुंजार लेकीला वाढदिवसाच्या अनंत शुभेच्छा.! आणि पुढील वाढदिवसापर्यंतचे मनातील स्वप्न पूर्ण होत एवढीच भैरवनाथ चरणी प्रार्थना......


# देवगिरी निवासस्थानी उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांची कैलास कावरे यांनी घेतली सदिच्छा भेट

**मुंबई :** आज मुंबई येथील देवगिरी निवासस्थान येथे राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा ज्येष्ठ नेत्या सुनेत्राताई पवार यांची युवासेना विधानसभाप्रमुख कैलास कावरे यांनी कामानिमित्त सदिच्छा भेट घेतली.

यावेळी विविध सामाजिक, विकासात्मक तसेच जनहिताच्या विषयांवर चर्चा करण्यात आली. कैलास कावरे यांनी आपल्या मतदारसंघातील नागरिकांच्या समस्या व प्रलंबित प्रश्नांविषयी माहिती देत त्यावर सकारात्मक कार्यवाही करण्याची अपेक्षा व्यक्त केली.

उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांनीही विविध विषयांवर मार्गदर्शन करत जनतेच्या हिताच्या कामांना प्राधान्य देण्याचे आश्वासन दिले. भेटीदरम्यान सौहार्दपूर्ण वातावरणात चर्चा झाली.

या सदिच्छा भेटीमुळे स्थानिक पातळीवरील विविध प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी सकारात्मक दिशा मिळेल, अशी भावना उपस्थितांनी व्यक्त केली.



# गुन्हेगारीवर वचक ठेवण्यासाठी सार्वजनिक ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवा-सपोनि राठोड

## सपोनि राठोड यांनी घेतली सिरसाळा परीसरातील सरपंचाची मुलाखत



**सिरसाळा:** सिरसाळा येथील गुन्हेगारीवर करडी नजर ठेवण्यासाठी आणि गुन्हेगारांचा शोध घेणे सोपे व्हावे, यासाठी गावातील मुख्य चौक आणि सार्वजनिक ठिकाणी सीसीटीव्ही (उउढत) कॅमेरे बसवणे अत्यंत गरजेचे आहे, असे प्रतिपादन सिरसाळा पोलीस ठाण्याचे साहाय्यक पोलीस निरीक्षक राठोड यांनी केले.

सिरसाळा पोलीस ठाण्यात आयोजित एका विशेष बैठकीत ते बोलत होते. मंगळवार, दिनांक २ जून २०२६ रोजी आयोजित या बैठकीला सिरसाळा परिसरातील विविध गावांतील सरपंच आणि प्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सिरसाळा पोलीस ॲक्शन मोडवर बेशिस्त वाहनचालकांवर थेट कारवाई

सिरसाळा | प्रतिनिधी

मागील काही वर्षांपासून सिरसाळा परिसरात विविध अवैध धंद्यांचे जाळे मोठ्या प्रमाणावर वाढल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत होत्या. यासंदर्भात अनेक प्रसारमाध्यमांमधून वृत्तांकनही झाले, मात्र अपेक्षित प्रमाणात कारवाई होत नसल्याने अवैध व्यवसायांना अधिक बळ मिळाल्याचे चित्र निर्माण झाले होते.

दरम्यान, नुकतेच सिरसाळा पोलीस ठाण्यात सहाय्यक पोलीस निरीक्षक म्हणून रुजू झालेले बी. बी. राठोड यांनी कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आक्रमक भूमिका घेतली आहे. वाहतूक नियमांचे उल्लंघन करणाऱ्या आणि बेशिस्त वाहनचालकांवर त्यांनी थेट रस्त्यावर उतरून कारवाई करण्यास सुरुवात केली आहे.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक परिसरात बेकायदेशीररीत्या उभ्या करण्यात आलेल्या वाहनांवर स्वतः उपस्थित राहून त्यांनी कारवाई केली. यामुळे वाहतूक शिस्तीबाबत पोलीस प्रशासन गंभीर असल्याचा संदेश नागरिकांमध्ये गेला आहे.

सिरसाळा परिसरातील विविध अवैध धंद्यांवर नियंत्रण मिळवणे हे सहाय्यक पोलीस निरीक्षक राठोड यांच्यासमोरील मोठे आव्हान मानले जात आहे. त्यांच्या धडाकेबाज कार्यशैलीमुळे या अवैध धंद्यांवर कितपत लगाम बसतो, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे.




दैनिक

# अतुल्य महाराष्ट्र

Last page

बीड, गुरुवार, 4 जून 2026

# परळी नगरपरिषदेत लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांना अभिवादन

## नगराध्यक्षांसह सर्व नगरसेवकांनी जागवल्या आठवणी



परळी वैजनाथ | प्रतिनिधी

दिवंगत लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या बाराव्या स्मृतीदिनानिमित्त परळी वैजनाथ नगर परिषद कार्यालय येथे प्रतिमा पूजन करुन लोकनेत्याला विनम्र अभिवादन करण्यात आले. दिवंगत गोपीनाथराव मुंडे हे लोकोत्तर लोकपुरूष आहेत. त्यांच्यासारखा लोकनेता पुन्हा होणे नाही. वंचित, उपेक्षित घटकांच्या न्यायासाठी अविरत संघर्ष करणारे ते अव्दितीय लोकनेते होते अशा शब्दात नगराध्यक्ष पद्मश्री धर्माधिकारी यांनी अभिवादन केले.

परळी न.प. कार्यालय येथे लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या बाराव्या स्मृती दिनानिमित्त कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी नगराध्यक्ष, उपनगराध्यक्ष, नगरसेवक, नगरसेविका त्याचबरोबर प्रशासनातील सर्व अधिकारी, कर्मचाऱ्यांनी आपल्या लाडक्या लोकनेत्यास पुष्प अपर्ण करुन विनम्रभावे अभिवादन केले. यावेळी नगराध्यक्षा सौ.पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी, उपनगराध्यक्षा खैसर राजाखान पठाण, मा.नगराध्यक्ष बाजीराव भैया धर्माधिकारी, रा.कॉ. गटनेते वैजनाथ सोळंके, भाजपा गटनेते तथा बांधकाम सभापती पवन मुंडे, महिला व बालकल्याण सभापती अंजली माळी,निळकंठ चाटे, राजाभैय्या पांडे,योगेश मेनकुदळे, महेंद्र रोडे, डॉ. पुजा प्रितेश तोतला, अर्चना रोडे, जयराज देशमुख, भिमा डावरे, आश्विन आघाव, सुशिल हरंगुळे, संपत बळवंत, प्रणव मराठे, शेख मोहशीन, योगेश पांडकर, नगरसेवक बब्बु, पिंटु मुरकुटे, रमेश पवार, जयपाल लाहोटी,अनंत इंगळे, प्रितेश तोतला, भागवत गित्ते आदींसह न.प. अधिकारी, कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.





# पंचायत समिती कार्यालयात लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन

### लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांचे कार्य व विचार आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी" - शिवाजीराव मुंडे

परळी वैजनाथ | प्रतिनिधी



महाराष्ट्राच्या सामाजिक, राजकीय आणि ग्रामीण विकासाच्या वाटचालीत अमूल्य योगदान देणारे, जनसामान्यांचे खरे प्रतिनिधी, दूरदृष्टीसंपन्न नेतृत्व व प्रभावी प्रशासक लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे साहेब यांच्या पुण्यतिथीनिमित्त परळी वैजनाथ पंचायत समिती येथे अभिवादन करण्यात आले.लोकनेते स्व. गोपीनाथराव मुंडे यांचे कार्य व विचार आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी आहेत. असे प्रतिपादन शिवाजीराव मुंडे यांनी केले आहे.

महाराष्ट्राभर लोकनेते गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांची ०३ जून रोजी पुण्यतिथी साजरी होते. त्या अनुषंगाने परळी वैजनाथ पंचायत समिती कार्यालयात लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या पुण्यतिथीनिमित्त अभिवादन करण्यात आले. लोकनेते गोपीनाथराव मुंडे यांच्या प्रतिमेचे परळी पंचायत समितीचे सहाय्यक गट विकास अधिकारी मा. शिवाजीराव मुंडे यांच्या हस्ते पूजन व पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

स्व. गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या लोकहितकारी कार्याचा व समाजासाठी दिलेल्या योगदानाचा यावेळी कृतज्ञतापूर्वक स्मरण करण्यात आले. लोकनेते स्वर्गीय गोपीनाथराव मुंडे यांनी आपले संपूर्ण आयुष्य उपेक्षित, कष्टकरी, शेतकरी, शेतमजूर, कामगार अशा गोरगरीब वंचित घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी खर्च केले. अठरापगड जाती-धर्माच्या लोकांना सोबत घेऊन समाजकारण व राजकारण केले. शेतकरी, कष्टकरी वर्गाबरोबरच राज्याच्या औद्योगिक आणि व्यावसायिक उत्कर्षासाठी ते आयुष्यभर धडपडत राहिले. राज्याच्या राजकारणाला त्यांनी एक नवीन दिशा देण्याचे मोलाचे कार्य केले. त्यांचे कार्य, विचार आणि सर्वसामान्यांप्रती असलेली बांधिलकी ही आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी असून समाजातील प्रत्येक घटकाने त्यांच्या कार्याचा आदर्श घ्यावा, असे प्रतिपादन परळी पंचायत समितीचे सहाय्यक गट विकास अधिकारी शिवाजीराव मुंडे यांनी केले. यावेळी परळी वैजनाथ पंचायत समितीतील सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# यवतमाळ विभाग उमरखेड आगाराच्या शिरपेचात मानाचा तुरा; बापूजी पारवेकर यांना 'लाल परी गौरव रत्न' पुरस्कार



**महागाव :** यवतमाळ विभागातील उमरखेड आगाराचे नियंत्रक बापूजी पारवेकर यांना महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (एसटी) वर्धापन दिनांनिमित्त मुंबई येथे प्रतिष्ठेचा 'लाल परी गौरव रत्न' पुरस्कार प्रदान करण्यात आला. त्यांच्या निष्ठावंत सेवा, प्रामाणिक कार्यपद्धती आणि कर्तव्यनिष्ठ योगदानाची दखल घेत हा सन्मान देण्यात आला आहे.

पारवेकर कुटुंब हे कष्ट, जिद्द आणि समाजसेवेचा वारसा जपणारे कुटुंब म्हणून ओळखले जाते. याच कुटुंबातील कृषिभूषण पुरस्कार विजेत्या लक्ष्मीताई पारवेकर यांनी आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर शेती क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण केली आहे. त्यांच्या यशाचा गौरव संपूर्ण परिसराला अभिमान वाटावा असा आहे.

आता त्याच कुटुंबातील बापूजी पारवेकर यांना एसटी महामंडळाच्या वर्धापन दिनांनिमित्त मिळालेला 'लाल परी गौरव रत्न' पुरस्कार हा त्यांच्या आयुष्यभराच्या सेवाभाव, प्रामाणिकपणा आणि समर्पणाचा गौरव मानला जात आहे. एका कुटुंबातील दोन कर्तृत्ववान व्यक्तींना वेगवेगळ्या क्षेत्रात मिळालेला हा सन्मान प्रेरणादायी ठरत आहे. एकाने शेती क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करून मान मिळवला, तर दुसऱ्याने सेवाभावातून सन्मान मिळवला. हा केवळ पुरस्काराचा आनंद नसून कष्ट, जिद्द आणि प्रामाणिकपणाचा गौरव असल्याची भावना नागरिकांनी व्यक्त केली.

बापूजी पारवेकर यांच्या या यशाबद्दल महागाव तालुक्यासह संपूर्ण परिसरातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## परळीत आर्थिक व्यवहारातून तरुणाचा खून

# रेल्वे पटरीवर मृतदेह फेकून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न, दोघांवर गुन्हा दाखल

परळी वैजनाथ | प्रतिनिधी




परळी ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत एक धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. आर्थिक व्यवहाराच्या कारणावरून एका तरुणाचा खून करून, पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने त्याचा मृतदेह रेल्वे पटरीवर फेकून दिल्याची खळबळजनक घटना घडली आहे. या प्रकरणी परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात दोन आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, अफजलखान उर्फ तोहीद खैरातीखान पठाण ( रा. सरदारनगर परळी, ता. परळी जि. बीड) असे मृत व्यक्तीचे नाव आहे. याप्रकरणी फिरोजखान खैरातीखान पठाण (वय ४५, रा. सरदारनगर परळी) यांनी पोलीस ठाण्यात तक्रार दिली आहे.

दिनांक ३१ मे २०२६ रोजी लेंडेवाडी शिवार येथे ही घटना असून. आरोपींनी आपसात संगनमत करून, मयताशी असलेल्या आर्थिक व्यवहाराच्या कारणावरून त्याचा खून केला. त्यानंतर गुन्ह्याचा पुरावा नष्ट करण्याच्या उद्देशाने मृतदेह लेंडेवाडी शिवारात परळी ते घाटनांदूर जाणाऱ्या रेल्वे पटरीवर फेकून दिला.

या प्रकरणी पोलिसांनी खालील आरोपींवर गुन्हा दाखल केला आहे ऋषिकेश परमेश्वर फड (रा. वरवटी, ता. अंबाजोगाई, ह.मु. सोमेश्वरनगर परळी तर गौरव दिपक व्यास (रा. स्नेहनगर परळी, ता. परळी, जि. बीड) या दोन्ही आरोपींविरुद्ध परळी ग्रामीण पोलीस ठाण्यात २६४/२०२६ नुसार भारतीय न्याय संहिता (BNS) कलम १०३(१), २३८, ३(५) अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

पोलीस निरीक्षक सय्यद यांच्या आदेशाने या प्रकरणाचा पुढील तपास ऋषिकेश शिंदे (सहाय्यक पोलीस अधीक्षक, अंबाजोगाई उपविभाग) यांच्याकडे सोपवण्यात आला आहे. दाखल अंमलदार म्हणून सपोनि मेंडके हे काम पाहत आहेत. या घटनेमुळे परळी परिसरात मोठी खळबळ उडाली असून पोलीस आरोपींचा शोध घेत आहेत.

# राडी येथे खेती बचाव अभियानाचा शुभारंभ

## शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञानाचे मार्गदर्शन

अंबाजोगाई | प्रतिनिधी



कृषी विभाग, भारत सरकार व महाराष्ट्र शासन कृषी विभाग यांच्या वतीने १ जून ते १५ जून या कालावधीत राबविण्यात येणाऱ्या "खेती बचाव अभियान" ची सुरुवात २ जून रोजी राडी येथे उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आली. खरीप हंगामाच्या पार्श्वभूमीवर आयोजित करण्यात आलेल्या या अभियानात शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञान, हवामान बदलाच्या परिस्थितीत पीक व्यवस्थापन तसेच शाश्वत शेती पद्धतींबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित असलेले कृषी विद्यावेत्ता डॉ. अरुण गुट्टे यांनी माती परीक्षणाचे महत्त्व अधोरेखित करताना शेतकऱ्यांनी माती परीक्षण अहवालानुसार खतांचा संतुलित वापर करावा, असे आवाहन केले. रासायनिक खतांबरोबरच हिरवळीच्या खतांचा वापर, एकात्मिक पोषण व्यवस्थापन (INM), सेंद्रिय व जैविक उत्पादनांचा अवलंब केल्यास जमिनीची सुपीकता वाढून उत्पादन खर्चात बचत होण्यास मदत होते, असे त्यांनी सांगितले.

यावेळी त्यांनी अल निनोच्या संभाव्य प्रभावाची माहिती देत बदलत्या हवामान परिस्थितीत सोयाबीन पिकाचे नियोजन कसे करावे याबाबत मार्गदर्शन केले. सोयाबीनच्या सुधारित वाणांची निवड, बीबीएफ (रुंद सरी-वरंबा) पद्धतीने पेरणी, कमी तसेच अतिवृष्टीच्या परिस्थितीत या पद्धतीचे होणारे फायदे, खत व्यवस्थापन, तण नियंत्रण, कीड व रोग व्यवस्थापन तसेच लागवडीपासून काढणीपर्यंतच्या सर्व बाबींवर त्यांनी शास्त्रीय माहिती दिली.

तालुका कृषी अधिकारी विजयकुमार पवार यांनी अल निनोचा खरीप हंगामावर होणारा परिणाम आणि त्यावर मात करण्यासाठी कृषी विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या उपाययोजनांची माहिती दिली. खरीप पेरणीपूर्व मोहिमेच्या माध्यमातून शेतकऱ्यांपर्यंत आवश्यक तांत्रिक माहिती पोहोचविण्याचे काम कृषी विभाग करत असल्याचे त्यांनी सांगितले.

तसेच श्री. बी. एस. सूर्यवंशी यांनी फार्मर कप स्पर्धा आणि एसओपी (स्टँडर्ड ऑपरेटिंग प्रोसिजर) याबाबत मार्गदर्शन करताना शेतकऱ्यांनी शास्त्रशुद्ध पद्धतीने शेती करून उत्पादनवाढ साध्य करण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान सरपंच प्रशांत पाटील यांनी भूषविले. यावेळी निळू नाना गंगणे, नाना पाटील, सुहास पाटील यांच्यासह रॉयल शेतकरी गटाचे सदस्य, झाशीची राणी महिला शेतकरी गटातील महिला तसेच गावातील अनेक शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.खेती बचाव अभियानाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना हवामान बदल, अल निनोचा प्रभाव, आधुनिक शेती तंत्रज्ञान आणि शाश्वत शेती पद्धती याबाबत उपयुक्त मार्गदर्शन मिळाल्याने उपस्थित शेतकऱ्यांनी समाधान व्यक्त केले.